# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

क्रमांक :- सीजीआरएफ/अेझेड/पीबिएन/९७/२००८/१८/ दिनांक :-

प्रति,
कार्यकारी अभियंता (प्रशासन ),
अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,
म.रा.वि.वि.कं.म., (सं व सु) मंडळ,
जिंतुर रोड, परभणी.

विषय :- श्री श्रीपाद गोविंदराव कोरान्ने, श्रेयस,रामकृष्णनगर अंकुरबालवाडी जवळ, वसमत रोड परभणी.
(ग्रा.क्र.५३००१०३१७८८५) यांचे गा-हाण्या बाबत.
संदर्भ :-१. दि, १५/०४/२००८रोजी सकाळी १२-०० वाजताची सुनावणी.
२. सीजीआरएफ/अेझेड/पीबिएन/९७/२००८/१८/००१०३ दि.३१/०३/२००८.

महोदय,

श्रीपाद गोविंदराव कोरान्ने, श्रेयस,रामकृष्णनगर अंकुरबालवाडी जवळ, वसमत रोड परभणी. यांनी या मंचात गा-हाणे दिनांक ३१/०३/२००८ रोजी टपाला द्वारे दाखल केले आहे. त्याची प्रत ३१/०३/२००८ पाटविलेली आहे. आपले म्हणणे अजुनही मिळालेले नाही.

या गा-हाण्याची पुढिल सुनावणी दिनांक २२/०४/२००८ रोजी सकाळी १२ -३० वाजता ठेवण्यात आली आहे. तरी आपण योग्य त्या कागद पत्रासह व संबंधीत अधिका-यासह या कार्यालयात उपस्थीत रहावे.

प्रत रवाना,

श्री श्रीपाद गोविंदराव कोरान्ने, श्रेयस,रामकृष्णनगर अंकुरबालवाडी, वसमत रोड परभणी. → आपण प्रतिनीधी नेमला नसल्यामुळे स्वतः या कार्यालयात वरिल सुनावणीच्या दिवशी हजर रहावे.

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/पीबीएन/९७/२००८/१८**

**तक्रार दाखल दिनांक ;-३१/०३/२००८**
**निकाल दिनांक ;- २०/०५/२००८**

**श्री श्रिपाद गोविंदराव कोराने,**
**''श्रेयस''रामकृष्णनगर,अंकुर बालवाडी जवळ,**
**वसमत रोड परभणी, ४३१ ४०१**

**अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित मंडळ, परभणी.**

**विषय ;- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल)विनियम २००६च्या अंतर्गत गा-हाणे.**

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र. विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल) विनियम २००६च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार

दाखल केली आहे. अर्जदाराने दिनांक ३१/०३/२००८ रोजी दाखल केलेल्या गा-हाण्याची प्रत दिनांक ३१/०३/२००८ रोजी परभणी मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) किंवा नोडल अधिकारी, परभणी यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले.

१) ग्राहकाने दाखल केलल्या तक्रारीचा सारांश खालील प्रमाणे आहे.
अर्जदाराने परभणी येथे घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला असून त्याला महावितरण कंपनीतर्फे देण्यात आलेला ग्राहक क्रमांक ५३००१०३१७८८५ असा आहे. अर्जदाराच्या तक्रारीनुसार त्यांना ३०-०९-२००७ ते ३०-१०-२००७ या काळात मिटर फॉल्टी दाखवुन ४६८ युनिटचे वीज वापर व मागील थकबाकी रूपये १२३१३-८२ दाखवत एकुण रुपये १४४५०/- चे वीज बिल आकारण्यात आले.सदरील चुकिच्या बिलाबाबत त्यांनी महावितरणच्या संबंधित विभागाकडे तक्रार दाखल केल्यानंतरही त्यांच्या तक्रारीची
दखल घेण्यात आली नाही त्यामुळे त्यांनी मंचात तक्रार दाखल केली असुन मिटरवरिल नोंदीप्रमाणे सुधारित वीज बिल देण्याबददल आदेश देण्याची विनंती मंचास केली आहे.

२) दि.१५.०४.२००८ रोजी ग्राहक श्री श्रिपाद कोराझे उपस्थित होते.
नोडल अधिकारी उपस्थित नव्हते व त्यांनी कोणताही लेखी जबाब मंचात दाखल केला नव्हता.वरील प्रकरणात सी.पी.एल. तसेच स्थळपाहणी अहवालाची गरज असल्यामुळे मंचाने पुढील सुनावणी दि.२२/०४/२००८ रोजी घेण्याचे निश्चित केले व नोडल अधिकारी यांना पुढील सुनावणीस हजर राहण्याचे आदेश देण्यात आले.

३) दि.२२/०४/२००८ रोजी सुनावणीच्यावेळी ग्राहक श्री श्रिपाद कोराम्ने तसेच नोडल अधिकारी यांचे प्रतिनीधी श्री सावरगावकर उपस्थित होते. नोडल अधिका-यातर्फे अर्जदाराच्या तक्रारिवरून त्यानी आपले म्हणणे दाखल केले त्याचप्रमाणे सि.पी.एल. व इतर आवश्यक कागदपत्रे त्यांनी दाखल केले. नोडल अधिकारी यांनी अर्जदारास चुकिचे बिल आकारण्यात आले असल्याचे मान्य केले. अर्जदारास देण्यात आलेल्या वीज बिलात रू.१२७६७/- कमी करुन तसे सुधारीत बिल ग्राहकास देण्याात आल्याचे त्यानी सुनावणी दरम्यान मंचात सांगितले. सदरिल प्रकरण मंचात चालु असतांना अर्जदारास सुधारीत बिल देण्यात आल्याबददल मंचाने नाराजी व्यक्त केली. नोडल अधिकारी यांच्या प्रतिनीधीस सुधारित बिल मंचात दाखल करण्याचे सांगण्यात आले व प्रकरण निकालासाटी राखुन ठेण्यात आले.

४) मंचात दोन्ही बाजुकडुन दाखल करण्यात आलेल्या कागदपत्राचे निरीक्षण केल्यावर असे आढळुन येते की अर्जदारास महावितरण कंपनीतर्फे देण्यात येणा-या ऑगस्ट २००७ च्या विज बिलापर्यंत कोणताही वाद नव्हता. अर्जदारास ३१/०८/२००७ ते ३०/०९/२००७ या काळात २२४९ युनीट वीज वापर तसेच ३०/०९/२००७ ते ३०/१०/२००७ या काळात ४६८ युनीटचे वीज बिल आकारण्यात आले असल्याचे आढळुन येते जे की मिटरवरील नोंद चुकिने ज्यास्त घेतली गेल्याने दिलेले आढळुन येते. नोडल अधिकारी यांच्या प्रतिनीधीने मंचात दाखल केलेल्या मार्च २००८ पर्यंतच्या सुधारित बिलाचे अवलोकन केल्यावर त्यात व्याज वा दंड लावण्यात आले नसल्याचे दिसुन येते. अर्जदाराने देखिल या बिलाबाबत आक्षेप नोंदविला नसल्यामुळे मंच हे सुधरित बिल मान्य करीत आहे.

मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) अर्जदारास देण्यात आलेले मार्च २००८ अखेरचे सुधारीत बिल रू.३१६०/- हे योग्य असुन अर्जदाराने ते २१ दिवसाच्या आंत भरावे.

२) चुकिच्या वीज बिलापोटी अर्जदारास झालेल्या मानसीक त्रासाबददल महावितरण कंपनीने अर्जदारास रू.३००/- नुकसान भरपाई द्यावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **विजय गो. जोशी** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/पिबिएन/१७/२००८/१८** **दिनांक ;-**

**प्रति,**

**१) कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. मंडळ, परभणी.**

**२) श्री श्रिपाद गोविंदराव कोराञे ,**
**''श्रेयस''रामकृष्णनगर,अंकुर बालवाडी जवळ,**
**वसमत रोड, परभणी,४३१४०१.**

**विषय ;-** क्र.सिजीआरएफ/एझेड/पिबिएन/१७/२००८/१८
गा-हाण्याचा आदेश.

वरिल विषयातील गा-हाण्याचा आदेश या पत्रा सोबत जोडला आहे.

ग्राहकास, जर आदेश मान्य नसेल तर तो विद्युत लोकपाल ( खाली दिलेला पत्ता ) यांच्याकडे आपले गा-हाणे आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आंत दाखल करु शकता.
सोबत ;- वरिल प्रमाणे.

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा ईमारत,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**